दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | मंगळवार दि.१२ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५० | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Tuesday 12 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 250 | Pages 4 | Rate 4 Rs

### मोदींच्या काळात कामगारांची अवस्था बिकट

**मुंबई**–पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात कामगारांची अवस्था बिकट झाली आहे. सध्या देशातील जवळपास २५ टक्के कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. देश चालवणाऱ्यांना कामगारांची मेहनत दिसत नाही, फक्त उद्योगपती मित्रांचे फायदे दिसतात, अशी टीका काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी सोमवारी केंद्र सरकारवर निशाणा साधताना केली.एसबीआयचा पीएलएफएस २०२५ अहवाल नुकताच जारी झाला. विजय वडेट्टीवार यांनी या अहवालाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर उपरोक्त शब्दांत निशाणा साधला. ते म्हणाले, सबका साथ, सबका विकास म्हणणाऱ्या मोदी सरकारच्या काळात कामगारांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया च्या झडत्रड २०२५ अहवालानुसार देशातील जवळपास २५% कंत्राटी कामगारांना किमान वेतनही मिळत नाही. महिलांची अवस्था तर आणखी वाईट आहे.

# आवादा कंपनीने दलित शेतकऱ्याला गंडवले?

## ७५ हजाराचा चेक दिला मात्र चेक वटलाच नाही

## मोबदला न दिल्याने २५ मे रोजी आमरण उपोषणाचा इशारा

### शेतकऱ्यांची सेटलमेंट करण्यासाठी दलालांचा वापर ?

पवनचक्की व वीजवाहिनी प्रकल्पासाठी शेतकऱ्यांशी थेट व्यवहार न करता काही खासगी दलालांमार्फत सेटलमेंट केली जात असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. अनेक शेतकऱ्यांना सुरुवातीला मोठ्या मोबदल्याचे आश्वासन दिले जाते, मात्र प्रत्यक्षात कमी रक्कम देऊन उर्वरित पैसे रखडवले जात असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून प्रशासनाने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

### संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक, मोबदला रखडवणे तसेच धनादेश बाऊन्स प्रकरणी संबंधित कंपनी अधिकारी व मध्यस्थ दलालांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पीडित शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### तहसीलदार भंडारे साहेब लक्ष देणार का ?

दलित शेतकऱ्याच्या मोबदल्याचा प्रश्न अद्याप प्रलंबित असून धनादेश बाऊन्स झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही संबंधित कंपनीकडून प्रतिसाद मिळत नसल्याने आता प्रशासन काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पीडित शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी तहसीलदार भंडारे साहेब पुढाकार घेणार का ? असा सवाल परिसरातील शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील कानडी माळी येथील एका दलित शेतकऱ्याला आवादा कंपनीने मोबदल्याच्या नावाखाली फसवल्याचा गंभीर आरोप समोर आला असून या प्रकरणामुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित शेतकऱ्याने तहसीलदार कार्यालयात निवेदन देत न्याय न मिळाल्यास दि. २५ मे २०२६ रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

महादेव भिकाजी मस्के असे तक्रारदार शेतकऱ्याचे नाव असून ते कानडी माळी येथील रहिवासी आहेत. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आवादा कंपनीने पवनचक्की प्रकल्पासाठी त्यांच्या सर्वे नं. ८३, ८४ व ८५ मधील मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली तसेच त्यांच्या शेतजमिनीवरून हाय व्होल्टेज वीजवाहिनी टाकण्यात आली. यासाठी कंपनीने सर्व व्हॅल्युएशनसह पाच लाख रुपये मोबदला देण्याचे मान्य केले होते.

मात्र प्रत्यक्षात फक्त एक लाख रुपयेच देण्यात आले असून उर्वरित रक्कम देण्यास कंपनीकडून टाळाटाळ केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ७५ हजार रुपयांचा देण्यात आलेला धनादेशही बाऊन्स झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.मागील तीन महिन्यांपासून कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी संबंधित अधिकारी फोन उचलत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे. आमची आर्थिक व मानसिक पिळवणूक झाली असून प्रशासनाने तात्काळ न्याय द्यावा, अशी मागणी शेतकरी महादेव मस्के यांनी केली आहे.दरम्यान, कानडी माळी परिसरातील इतर काही शेतकऱ्यांनाही अशाच प्रकारचा अनुभव आल्याची चर्चा असून या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.




## केज पोलिस ठाण्यात विवाहितेच्या विनयभंग प्रकरणी विनयभंग व अट्रॉसीटीचाही गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**





केज तालुक्यातील एका खेडेगावातील आंतरजातीय विवाह केलेल्या एका आदिवासी विवाहितेचा विनयभंग केल्याप्रकरणी ढाकेफळ येथील बाळू उर्फ श्रीराम थोरात याच्या विरुद्ध केज पोलिसात विनयभंग व अट्रॉसिटीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना रवीवार दि.११ मे रोजी सकाळी पिसेगाव फाटा परिसरात घडली.

केज तालुक्यातील एका खेडेगावातील आदिवासी समाजातील एका तरुणी ने सहा वर्षांपूर्वी केज तालुक्यातीलच एका खेडेगावातील तरुणा सोबत आंतरजातीय विवाह केला असून ते दोघेही सध्या परगावी एकत्र राहत आहेत. रविवार दि.११मे रोजी हे दाम्पत्य आपल्या खेडेगावातून केज येथे कपडे खरेदीसाठी दुचाकीवरून जात असताना विवाहितेच्या पतीच्या ओळखीच्या मित्राने पिसेगाव फाट्या जवळील मानवलोक कार्यालयासमोर हात दाखवून त्यांना थांबविले. पांढऱ्या रंगाच्या कार मध्ये आसलेल्या बाळू उर्फ श्रीराम थोरात यांनी कार थांबवून संबंधित महिलेबाबत जातीवाचक आणि लज्जा वाटेल असे अश्लील वक्तव्य करून तिच्या पतीशी वाद घातला.यावेळी महिलेच्या पतीने विरोध दर्शविल्यानंतर आरोपीने संबंधित महिलेकडे शरीरसुखाची मागणीही केल्याचा आरोप फिर्यादी मध्ये करण्यात आला आहे.या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून केज पोलिस ठाण्यात बाळू उर्फ श्रीराम थोरात याच्याविरुद्ध विनयभंग व अनुसूचित जाती- जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पुढील तपास केज पोलिस करीत आहेत.

## अवैध वृक्ष तोडीला अधिकाऱ्याचे अभय, सामाजिक कार्यकर्ते उजगरे यांचा आरोप

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



केज तालुक्यातील युसूफवडगांव व परिसरात गेल्या काही दिवसांपासुन अवैध वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होत असुन याकडे धारूर वनपरिक्षेत्राचे अधिकारी ईश्वर गुनावत यांचे दुर्लक्ष होत असून,त्यांच्याकडून आरोपीला अभय मिळत असल्याची चर्चा आहे.

शुक्रवार दि.८ मे रोजी रात्री साडे सात वाजण्याच्या दरम्यान युसूफवडगांव परिसरातून शेवरी जातीच्या वृक्षाची तोड करून ते ट्रकमध्ये भरून जाणारी मालट्रक क्र.एम एच १२ एन एक्स २४८३ ही गाडी युसूफ वडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन उजगरे यांनी धनेगाव फाट्यावरील वजन काट्यावर आली आसता पकडून धारूर वनपरिक्षेत्राचे वनाधिकारी ईश्वर गुनावत यांना कारवाई करून गाडी ताब्यात घेण्यासाठी यांना वारंवार फोन करूनही ते आले नाहीत.त्यामूळे अवैध व विना परवाना लाकूड तोड करणाऱ्यांना त्यांचे अभय असल्याचे चर्चा परिसरात सुरु आहे. युसूफवडगांव पोलीस स्टेशनला पण वारंवार फोन करून ही माहिती दिली असता कोणीही आले नाही.ही लाकूड तोड आमच्या क्षेत्रात येत नसल्याचे कारण देत त्यांनी पण कारवाईस टाळाटाळ केली आहे. प्रशासनाने अशा कामचुकार व लाकुड चोरांना पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन उजगरे यांनी केली आहे.तसेच युसूफवडगाव परिसरातील नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## संविधान बंगल्याच्या वास्तुशांतीप्रसंगी प्रा.मनोहर धोंडे यांची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना शुभेच्छा भेट

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या मुंबई येथील बांद्रा पूर्व परिसरातील संविधान बंगला या निवासस्थानाचे नव्याने बांधकाम पूर्ण झाल्यानंतर आज वास्तुशांती कार्यक्रम उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्राध्यापक मनोहर धोंडे यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांना शुभेच्छा दिल्या. नव्याने उभारण्यात आलेल्या संविधान बंगल्याला भेट देत त्यांनी वास्तुशांती कार्यक्रमाबद्दल आनंद व्यक्त केला.

या भेटीदरम्यान सामाजिक, शैक्षणिक तसेच वंचित घटकांच्या विकासासंदर्भातील विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. युवकांना मुख्य प्रवाहात आणणे, सामाजिक न्याय, शिक्षण क्षेत्रातील बदल आणि संघटनात्मक कार्य यांसारख्या विषयांवर सकारात्मक विचारविनिमय झाल्याची माहिती उपस्थितांकडून देण्यात आली.

प्रा. मनोहर धोंडे सर यांनी रामदास आठवले यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.


## मान्सून वेळेपूर्वीच धडकणार! महाराष्ट्रातही लवकर आगमनाची शक्यता,स्कायमेटचा अंदाज

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या भीषण उन्हाळा आणि अंगाची लाहीलाही करणारा उकाडा जाणवत असतानाच हवामान खात्याकडून एक दिलासादायक बातमी समोर आली आहे.यंदाचा मान्सून अंदमानात आपल्या ठरलेल्या वेळेच्या आधीच धडकण्याची शक्यता आहे.खाजगी हवामान संस्था 'स्कायमेट'च्या अंदाजानुसार,बंगालच्या उपसागरात निर्माण होत असलेल्या अनुकूल परिस्थितीमुळे मान्सून च्या प्रवासाला वेग मिळाला असून लवकरच अंदमान निकोबार बेटांवर पावसाच्या सरी कोसळण्यास सुरुवात होईल.

कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनला गती

हवामान शास्त्रज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ आणि १३ मे २०२६ दरम्यान विषुववृत्तीय प्रदेशाजवळ आणि दक्षिण-पश्चिम बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची



शक्यता आहे.याहवामान प्रणालीमुळे विषुववृत्तीय वाऱ्यांचा वेग वाढणार असून मान्सूनला पुढे सरकण्यासाठी मोठी चालना मिळेल.यापूर्वी मान्सूनचे आगमन १४ ते २२ मे २०२६ दरम्यान होईल असा अंदाज होता,मात्र आता हे आगमन त्याआधीच होण्याची चिन्हे गडद झाली आहेत.भारतीय हवामान विभागानेही १४ ते २० मे २०२६ दरम्यान अंदमान समुद्रात नैर्ऋत्य वारे सक्रिय होतील,असा दुजोरा दिला आहे.

**महाराष्ट्रातील आगमनाचे समीकरण**

साधारणपणे,मान्सून दाखल एकदा अंदमानात झाला की तिथून कोकणा पर्यंत पोहोचण्यासाठी त्याला सुमारे २१ दिवसांचा कालावधी लागतो.जर अंदमानात मान्सूनने वेळेपूर्वी हजेरी लावली,तर महाराष्ट्रातही यंदा पावसाचे आगमन वेळेवर किंवा काही दिवस आधीच होण्याची दाट शक्यता आहे.यामुळे भीषण उकाड्याने त्रस्त असलेल्या महाराष्ट्र वासीयांना मोठा दिलासा मिळू शकतो.

# संपादकीय

## भारतीय पर्यटनाचे स्वरूप बदलणारे 'सॅफ्रनस्टेज'



भारतीय प्रवाशांची मानसिकता गेल्या काही वर्षांत झपाट्याने बदलत आहे. केवळ पर्यटन स्थळ पाहणे इतक्यावर समाधान न मानता, आता प्रवासी त्या ठिकाणाच्या संस्कृतीत मिसळून 'स्थानिकांसारखे' जगण्याचा अनुभव शोधत आहेत. याच बदलत्या प्रकृतीला ओळखून एक अनोखी वाट चोखाळली ती 'सॅफ्रनस्टेज' या कंपनीने.२०१६ साली तेजस परुळेकर यांनी स्थापन केलेली ही कंपनी आज देशभरातील नयनरम्य ठिकाणी खासगी, आलिशान बंगल्यांमधून प्रवाशांना वेगळाच अनुभव देत आहे. एका कर्मचाऱ्यापासून सुरू झालेला हा प्रवास आज ११५ कर्मचारी, ३५० केअरटेकर्स आणि तब्बल ४५ कोटी रुपयांच्या वार्षिक उलाढालीपर्यंत पोहोचला आहे. या यशामागे आहे एक साधी, पण प्रभावी कल्पना. तेजस आणि तिचे पती देवेंद्र परुळेकर यांनी आपल्या युरोप प्रवासादरम्यान अनुभवलेल्या 'बेड अँड ब्रेकफास्ट' आणि अपार्टमेंट स्टेने त्यांना विचार करायला भाग पाडले. लहान मुलांसोबत प्रवास करताना हॉटेलपेक्षा खासगी जागा, स्वयंपाकघर आणि निवांत वातावरण किती महत्त्वाचे आहे, हे त्यांना जाणवले.स्पेन आणि फ्रान्समधील संथ, आरामदायी सुट्ट्यांचा अनुभव घेतल्यानंतर त्यांच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला. भारतामध्ये अशी सोय सहज का उपलब्ध नाही?


मुंबईत वाढलेल्या तेजसला प्रवासाची आवड लहानपणापासूनच होती. तिच्या वडिलांच्या नोकरीमुळे तिच्या कुटुंबाला माथेरान, महाबळेश्वरसारख्या ठिकाणी हॉलिडे होम्समध्ये राहण्याचा अनुभव मिळत असे. तिचं कुटुंब एका आठवड्यासाठी पूर्ण बंगला भाड्याने घेत. स्वयंपाकीसोबत असायचा. तो संपूर्ण बंगला आपल्यासाठी आहे ही भावना काही काळापुरती का असेना पण समाधान देऊन जायची. तो अनुभव अविस्मरणीय तेजससाठी होता. आर. ए. पोदार कॉलेजमधून शिक्षण घेतल्यानंतर तेजस हिने सनदी लेखापाल अर्थात चार्टर्ड अकाऊंटंटचा अभ्यासक्रम पूर्ण केला. आयसीआयसीआय लिमिटेडमध्ये मुख्य व्यवस्थापक पदापर्यंत मजल मारली. कालांतराने तिचे लग्न देवेंद्र परुळेकर यांच्यासोबत झाले. ते अन्र्स्ट अँड यंग या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत होते. स्थिर करिअर असूनही, काहीतरी वेगळे करण्याची इच्छा तेजसला स्वस्थ बसू देत नव्हती. अनेक वर्षांच्या संशोधन आणि नियोजनानंतर २०१४ मध्ये तिने 'सॅफ्रनस्टेज'ची सुरुवात केली. सुरुवातीला ही कंपनी फक्त होमस्टे एग्रीगेटर म्हणून कार्यरत होती. मात्र, २०१५ मध्ये माथेरानमधील एका १०० वर्षे जुन्या पारशी घराच्या व्यवस्थापनाची संधी मिळाली आणि इथेच व्यवसायाला नवे वळण मिळाले. त्या क्षणापासून सॅफ्रनस्टेजने केवळ घरांची यादी न देता, स्वतः त्या मालमत्तांचे व्यवस्थापन आणि देखभाल करण्याचा निर्णय घेतला. यामुळे ग्राहकांना अधिक दर्जेदार आणि विश्वासार्ह अनुभव मिळू लागला.आज सॅफ्रनस्टेजकडे सुमारे २७० हून अधिक मालमत्ता उपलब्ध आहेत. मुंबईजवळील कर्जत, लोणावळा, पालघरपासून ते उत्तर भारतातील शिमला, मनाली, नैनिताल आणि दक्षिणेतील कुर्ग, ऊटी, वायनाडपर्यंत या सेवा विस्तारल्या आहेत. कोविड–१९ महामारीने जिथे अनेक व्यवसायांना फटका बसला, तिथे सॅफ्रनस्टेजसाठी हा टर्निंग पॉइंट ठरला. लोकांनी गर्दीच्या हॉटेल्सऐवजी खासगी व्हिलांना पसंती दिली. २०१९–२० मध्ये १५ कोटी असलेली उलाढाल त्याच्या पुढच्या वर्षी २० कोटींवर पोहोचली. लॉकडाऊननंतर तर ९०% पर्यंत बुकिंग्स व्हायचे असा तेजसचा दावा आहे. सॅफ्रनस्टेजचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे स्थानिक समुदायांवर दिलेले लक्ष. कंपनी स्थानिकांना केअरटेकर म्हणून नोकऱ्या देते. स्थानिक अन्नसाहित्य वापरते. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळते. विशेष म्हणजे, कंपनीत ३५% महिला कर्मचारी आहेत. जे लैंगिक समतेच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.यशाच्या या प्रवासात त्यागही तितकाच महत्त्वाचा आहे. तेजस सांगते, आम्ही आमची जीवनशैली साधी ठेवली. महागड्या गोष्टींचा मोह टाळला. उद्योजकतेसाठी हा त्याग आवश्यक असतो. सॅफ्रनस्टेजचे लक्ष्य आता आणखी मोठे आहे. वर्षाअखेरीस २०० नवीन घरे जोडण्याची योजना असून, किल्ले, राजवाडे आणि वारसा स्थळांवर विशेष लक्ष दिले जाणार आहे. याशिवाय 'सॅफ्रनस्टेज जर्नीज' या ट्रॅव्हल प्लॅटफॉर्मद्वारे संपूर्ण प्रवास अनुभव देण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. आजच्या बदलत्या पर्यटन युगात, सॅफ्रनस्टेजने एक नवा ट्रेंड निर्माण केला आहे. प्रवास म्हणजे केवळ ठिकाण पाहणे नव्हे, तर त्या ठिकाणाला अनुभवणे. भारतातील खऱ्या संस्कृतीचा अनुभव घ्यायचा असेल, तर सॅफ्रनस्टेज हे पहिले नाव असावे, हे तेजसचं स्वप्न आहे.एक अनुभव व्यवसायात कसा बदलू शकतो याचं हे उत्तम उदाहरण आहे.

# विनापरवाना शेतमाल खरेदी-विक्री करणाऱ्यांवर होणार कारवाई

## फळे, भाजीपाल्यांत भेसळ करणाऱ्यांचीही खैर नाही–मंत्री जयकुमार रावल

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यात शेतकऱ्यांच्या व्यापक हिताचे संरक्षण आणि कृषी उत्पन्न बाजार व्यवस्थेतील पारदर्शकता टिकवून ठेवण्यासाठी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी–विक्री व्यवहाराचे नियमन करण्यात येते. मात्र राज्यातील काही भागांत अनेक व्यापारी, संस्था तसेच काही शेतकरी उत्पादक कंपन्या कोणत्याही परवान्याविना शेतमाल खरेदी–विक्री करत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.पणन संचालनालयाने यासंदर्भात परिपत्रक जारी केले असून, संबंधितांना वेळोवेळी सूचना देऊनही काही व्यापारी व संस्था विनापरवाना व्यवहार करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता कायद्यानुसार आवश्यक परवाना घेतल्याशिवाय शेतमाल खरेदी–विक्रीचा व्यवसाय करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.शासनाने दि. ५ जुलै २०१६ आणि दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या सुधारित तरतुदींनुसार कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात शेतमाल व्यापारासाठी आवश्यक परवाना घेणे बंधनकारक केले आहे. बाजार समितीकडून संबंधित परवाना धारकांकडून बाजार शुल्क आकारले जाणार नसले तरी कायद्यानुसार परवाना घेणे आवश्यक राहणार आहे.कायद्यातील कलम ५ (ड) अंतर्गत थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी–ग्राहक बाजार तसेच ई–ट्रेडिंग प्लॅटफॉर्मसाठी परवाना देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे व्यापारी, संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या तसेच इतर संबंधित घटकांनी आवश्यक परवानगीशिवाय शेतमाल व्यापार करू नये, अन्यथा त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिला आहे.



# सौर कृषिपंप लाभार्थ्यांनी इतरांनाही प्रेरणा द्यावी

## नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव श्री.संतोष कुमार सारंगी यांचे आवाहन





**दैनिक वादळ वार्ता**
**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी**

विकसित भारतासाठी शेतकरीही विकसित व्हायला हवा, यासाठी शेतकऱ्यांना केंद्र सरकारतर्फे सौर कृषिपंपांसह विविध योजनांचा लाभ देण्यात येत आहे. या योजनांच्या लाभार्थ्यांनी इतर शेतकऱ्यांनाही सौर पंपांचा लाभ घेण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन केंद्र सरकारच्या नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव श्री.संतोष कुमार सारंगी यांनी केले.

महापारेषणच्या सभागृहात पीएम–कुसुम बी व मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेच्या लाभार्थ्यांशी श्री.सारंगी यांनी संवाद साधला. यावेळी राज्याचे नवीन और नवीकरणीय ऊर्जा, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, नवीन व नवीकरणीय मंत्रालयाचे सहसचिव जेव्हीएन सुब्रमण्यम, विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या संचालक श्रीमती चंद्रा, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक आदित्य जीवने , कार्यकारी संचालक (वितरण) धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) पंकज तगलपल्लेवार, छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांची प्रमुख उपस्थिती होती.

सचिव श्री.सारंगी, सहसचिव श्री.सुब्रह्मण्यम, संचालक श्रीमती चंद्रा यांनी लाभार्थ्यांशी सौरपंप बसवण्याआधीची व नंतरची स्थिती, पीक पद्धती व उत्पादनात झालेले बदल याविषयी संवाद साधला. छत्रपती संभाजीनगर, जालना व बीड जिल्ह्यातील लाभार्थी अंकुश बर्गे, वैशाली लहाने, बळीराम लहाने, सचिन जोशी, गजानन शिंदे, विजय जावळे यांनी सौर ऊर्जेमुळे आयुष्यात परिवर्तन झाल्याचे सांगितले. आधी वीज नसल्याने डिझेलपंप लावून पिकांना पाणी द्यावे लागायचे. त्यासाठी दिवसाकाठी ७०० ते ८०० रुपये डिझेलला खर्च व्हायचे. मात्र शासनाकडून अनुदानावर सौर कृषिपंप मिळाल्याने डिझेलचा खर्च वाचला आहे. दिवसा खात्रीशीर वीज मिळत असल्याने नगदी पिके घेतली आणि उत्पन्नात वाढ झाली, असे लाभार्थ्यांनी सांगितले. व्यवसायाने विद्युत अभियंता असलेले सचिन जोशी यांनी सौरपंप बसवल्यानंतर शेतीत भरघोस उत्पादन होत असल्याचे सांगितले. आधी कोरडवाहू शेती होती. तेव्हा एकच पिक होते. मात्र सौरपंप बसवल्यानंतर भाजीपाला, फळे लागवड केल्याने उत्पन्न वाढले. या योजनेचा लाभार्थी म्हणून राष्ट्रपती भवनात जाण्याचीही संधी मिळाली, असे बळीराम लहाने यांनी सांगितले.

सौर पंप योजनेत ग्राहकांना सुलभरीत्या लाभ मिळवा यासाठी महावितरणतर्फे करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती अधीक्षक अभियंता संजय सरग यांनी दिली. अर्ज करण्यापासून ते पंप बसवण्यापर्यंत मानवी हस्तक्षेप टाळून महावितरणकडून पारदर्शक पद्धतीने सर्व प्रक्रिया होते. त्यामुळे महाराष्ट्रात या योजनेला यश मिळाल्याचे श्री.सरग यांनी सांगितले.

यावेळी सचिव श्री.संतोष कुमार सारंगी म्हणाले, कुसुम बी व मागेल त्याला कृषी पंप योजनेचा लाभ झाल्याचे जेव्हा शेतकरी सांगातात, तेव्हा या योजनेचा उद्देश सफल झाल्याचे समाधान वाटते. स्वातंत्र्यानंतर शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना आल्या. मात्र त्या सर्वांत फायदेशीर ही सौर कृषी पंप योजना आहे. कारण याचा शेतकऱ्यांना थेट लाभ होत आहे. ज्या शेतकऱ्यांना पंप मिळाल्यानंतर त्यांचे जीवनमान सुधारले, त्यांनी इतर शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ घेण्यास प्रेरित करावे, असे आवाहन त्यांनी केले. महाराष्ट्रात सौर पंप योजना यशस्वीपणे राबवल्याबद्दल श्री.सारंगी यांनी महावितरणचे अभिनंदन केले. केंद्र सरकारतर्फे आता पीएम–कुसुमअंतर्गत ग्री फोटो व्होल्टाइक योजना राबवण्यात येणार आहे. त्यात सौर पॅनल शेतात विशिष्ट उंचीवर बसवून पॅनलखालील भूभागही पिकांच्या लागवडीसाठी वापरता येणार आहे. पॅनलच्या सावलीत भाजीपाला चांगला पिकवता येतो. देशात काही ठिकाणी असे पॅनल बसवण्यात आल्याचे सचिव श्री.सारंगी यांनी सांगितले.

कार्यकारी संचालक श्री.धनंजय औंढेकर यांनी प्रास्ताविक केले. ड.युगंधरा नामदे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट यांनी आभार मानले. अधीक्षक अभियंता संदीप दरवडे, प्रेमसिंग राजपूत यांनी स्वागत केले.

**सौर कृषी वाहिनी प्रकल्प व सौरपंपाची पाहणी**

नवीन और नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव श्री.संतोष कुमार सारंगी यांनी सिल्लोड तालुक्यातील वरखेडी येथील ६ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्पाचीही पाहणी केली. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेत कार्यान्वित करण्यात आलेल्या या प्रकल्पातून आळंद उपकेंद्रावरील ३ हजार १४८ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा केला जातो. याबाबत श्री.सारंगी व त्यांच्या सहकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. या पथकाने फुलंब्री तालुक्यातील उमरावती येथील शेतकरी आरिफ हुसेन सय्यद यांच्या शेतातील सौर पंपाची पाहणी केली. ५ एचपी क्षमतेच्या पंपामुळे शेती सिंचन सोयीचे झाल्याचे यावेळी शेतकऱ्याने सांगितले.

# जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या तिन्ही शाळांचा दहावीचा शंभर टक्के निकाल-ग्रामीण भागातील इंग्रजी शिक्षणाची परंपरा अधिक भक्कम

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई | प्रतिनिधी**

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था संचलित हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियम स्कूल, न्यू इंग्लिश मिडियम स्कूल तसेच पदाजी पांडुरंग मुंबाईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या तिन्ही विद्यालयांचा इयत्ता दहावीचा मार्च २०२६ परीक्षेचा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून तिन्ही शाळांनी शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण उपलब्ध व्हावे, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि शहरांप्रमाणेच आधुनिक शिक्षणाच्या संधी गावागावात पोहोचाव्यात या दूरदृष्टीतून संस्थेचे संस्थापक मा. श्री. जे. एम. म्हात्रे साहेब यांच्या विचारातून या शाळांची निर्मिती करण्यात आली होती. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संस्थेचा संकल्प आजही यशस्वीपणे पुढे नेला जात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

तिन्ही विद्यालयांतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक व नागरिकांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियम डलहेश्र मधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये –
कु.श्वेता प्रभुनाथ पटेल–८९ टक्के
कु.महिमा जनार्दन गावडे–८९ टक्के
कु.रुद्राणी द्वारकानाथ पाटील–८९ टक्के
या विद्यार्थिनींनी संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच –
प्रिन्स कुमार दिनेश मंडल – ८२.६० टक्के
रश्मित रुपेश कांबळे – ८२ टक्के
या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

तर न्यू इंग्लिश मिडियम स्कूल मधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये –
कु. रिया मनोज शेस्त्री – ८२.२० टक्के
आदित्य रजनीश भारतीय – ७९ टक्के
कु. तृष्णा संतोष नेवरेकर – ७५ टक्के
या विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन करून विद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

तसेच पदाजी पांडुरंग मुंबाईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये –
कु. प्राजक्ता दीनानाथ ठाकूर – ८९.४० टक्के
मास्टर शौर्य शैलेश पाटील – ८९.२० टक्के
कु. गीतिका मेघनाथ पाटील – ८८.४० टक्के
या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.

विद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याच्या जोरावर हे यश मिळविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर उत्कृष्ट निकाल मिळवत एक आदर्श निर्माण केला आहे.

तिन्ही विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी माध्यमातील आत्मविश्वास, स्पर्धा परीक्षा तयारी, संस्कारमूल्ये आणि सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन करताना सांगितले की,या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत हे महत्त्वाचे घटक ठरल्याची भावना विद्यालय व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आली.तिन्ही विद्यालयांच्या शंभर टक्के निकालामुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण शैक्षणिक क्षेत्रात संस्थेने पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांचे विशेष कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील शैक्षणिक परंपरेचा गौरव वाढवत उत्कृष्ट यश संपादन केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.याप्रसंगी सौ. ममता प्रितम म्हात्रे, सभापती महिला व बालकल्याण समिती, पनवेल महानगरपालिका या उपस्थित होत्या.



> "विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ गुणांपुरते मर्यादित नसून त्यांच्या मेहनती, शिस्त आणि जिद्दीचे प्रतीक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे हा संस्थेचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. पुढील काळातही संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता, संस्कार आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास याला प्राधान्य देत असेच उत्कृष्ट निकाल कायम राखण्याचा आमचा संकल्प आहे.
> – श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे
> अध्यक्ष,जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था

# मुंबईत MTNL केबल चोरीचे रॅकेट सक्रिय?

## भूमिगत कॉपर केबल चोरीमुळे कोट्यवधींचे नुकसान; मोठ्या चौकशीची शक्यता

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

MTNL या सरकारी दूरसंचार संस्थेच्या भूमिगत कॉपर केबल चोरीच्या घटना मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर वाढत असून, त्यामुळे सरकारी यंत्रणांसह नागरिकांनाही मोठा फटका बसत आहे. जोगेश्वरी, मालाड, चारकोप आणि सायन परिसरात उघडकीस आलेल्या विविध घटनांमुळे संघटित टोळ्या सक्रिय असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

आरटीआय कार्यकर्ते गणेश ननावरे यांनी या प्रकरणात गंभीर आरोप करत अनेक दस्तावेज व पुरावे गोळा केल्याचा दावा केला आहे. काही वरिष्ठ अधिकारी व पोलीस अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली असून, या संदर्भात लवकरच उच्च न्यायालयात याचिका दाखल होण्याची चर्चा सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जोगेश्वरी परिसरात ८ आरोपींना अटक करून सुमारे ५८ लाख रुपये किमतीची १,११० मीटर कॉपर केबल जप्त करण्यात आली होती. आरोपी स्वतःला MTNL कर्मचारी किंवा कंत्राटदार असल्याचे सांगून रात्रीच्या वेळी खोदकाम करत असल्याचे तपासात समोर आले.

तसेच मालाड आणि चारकोप परिसरात पोलिसांनी रात्रीच्या गस्तीदरम्यान एका वाहनातून MTNL केबल, कटर मशीन आणि इतर साहित्य जप्त करत ५ जणांना अटक केली होती.

सायन परिसरात तर तब्बल ३० जणांच्या टोळीने जेसीबीच्या सहाय्याने भूमिगत केबल चोरीचा प्रयत्न केल्याचे उघड झाले. या प्रकरणात १४ आरोपींना अटक करण्यात आली असून, एका रात्रीत ३० ते ४० लाख रुपयांचा माल चोरी करण्याचा कट असल्याचे पोलिस तपासात स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेतही चढछड केबल चोरीचा मुद्दा गाजला होता. सरकारी आकडेवारीनुसार २०२३ मध्ये ७, २०२४ मध्ये १९ तर २०२५ मध्ये २६ गुन्ह्यांची नोंद झाली असून, आतापर्यंत ५८ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

या सततच्या चोरीमुळे लँडलाइन सेवा, इंटरनेट नेटवर्क आणि सरकारी दूरसंचार व्यवस्था वारंवार विस्कळीत होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कॉपरला बाजारात मोठी किंमत मिळत असल्याने अशा गुन्ह्यांत वाढ होत असल्याचे तपास यंत्रणांचे मत आहे.

या प्रकरणांमध्ये विठ्ठल शिंदे, शंकर शिंदे, सागर शिंदे, कैलास कुराडे, राजेश यादव, मकबूल शेख व कांतप्रसाद यादव यांच्यासह काही आरोपींची नावे समोर आली आहेत.

या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरत आहे.



## माजलगावात भंते बुद्धरत्न महाथेरो यांची धम्मदेशना संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**



येथील दैनिक 'प्रवक्ता लोकशाहीचा' या वृत्तपत्राचे पत्रकार अजिंक्य वाघमारे यांच्या निवासस्थानी १० मे रोजी बुद्ध पौर्णिमा निमित्त आयोजित पूजेत नंदुरबार येथील पूज्य भंते बुद्धरत्न महाथेरो यांनी धम्मदेशना दिली.नंदुरबार येथील सुप्रसिद्ध धम्मगुरू भंते बुद्धरत्न महाथेरो हे माजलगाव शहराच्या दौऱ्यावर आले असता, त्यांनी विशेष वेळ काढून पत्रकार अजिंक्य वाघमारे यांच्या घरी भेट दिली.

यावेळी त्यांनी उपस्थित कुटुंबीयांना आणि उपस्थित उपासक-उपासिकांना बुद्धांच्या शिकवणीवर आधारित धम्मदेशना दिली. दैनंदिन जीवनात सदाचाराचे महत्त्व आणि धम्माचे आचरण कसे असावे, यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

या मंगलप्रसंगी भंतेजींनी अजिंक्य वाघमारे यांच्या चिमुकल्या बाळालाही कुशीत घेऊन शुभाशीर्वाद दिले. या भेटीदरम्यान अजिंक्य वाघमारे व त्यांच्या कुटुंबीयांनी भंतेजींचे श्रद्धेपूर्वक स्वागत व पूजन केले. यावेळी परिसरातील काही मान्यवर आणि बौद्ध अनुयायी उपस्थित होते. या भेटीमुळे वाघमारे कुटुंबीयांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

## जेष्ठ पत्रकार शेषेराव कंधारे यांचा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील धुप्पा येथील जेष्ठ पत्रकार तथा दैनिक लोकपत्र चे नायगाव तालुका प्रतिनिधी शेषेराव लक्ष्मण कंधारे यांचा दि.१० मे रोजी बिड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारीता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दैनिक लोकनेताच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जगप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने,अभिनेत्री मेघना झुझूम,बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे, डॉ. मयंक गांधी (संस्थापक GVT),जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात,जिल्हा परिषदेचे सीईओ जितीन रहेमान, पोलीस निरीक्षक नाचेन, नगराध्यक्षा




पद्मश्रीताई धर्माधिकारी यांच्या हस्ते शाल.पुष्पहार,ट्रॉफी व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. दैनिक लोकपत्र चे नायगाव तालुका प्रतिनिधी म्हणून कार्यरत असलेले शेषेराव कंधारे यांनी गेल्या अठरा वर्षापासूनग्रामीण भागातील सामाजिक, शैक्षणिक आणि जनहिताच्या प्रश्नांवर सातत्याने लेखणी चालवत पत्रकारितेत वेगळी ओळख निर्माण केली आहे. पत्रकार शेषेराव कंधारे यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत

दैनिक लोकनेता परिवाराच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारांता पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय मिळालेल्या या सन्मानाबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## पिंपळगाव-कोठगाव बोडदा घाटावर अवैध रेती वाहतूक सुरूच

### शासनाचा महसूल बुडतोय, महसूल विभाग गप्प का?

दैनिक वादळ वार्ता
**चिमूर । प्रतिनिधी**



चिमूर तालुक्यातील पिंपळगाव-कोठगाव परिसरातील बोडदा घाटावरून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा व वाहतूक सुरू असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. दिवसाढवळ्या ट्रॅक्टर तसेच इतर वाहनांच्या माध्यमातून रेतीची खुलेआम वाहतूक होत असून शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, संबंधित घाटावरून दररोज मोठ्या प्रमाणात रेतीचा उपसा केला जात आहे. मात्र महसूल विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अवैध रेती उपशामुळे नदीपात्राचे मोठे नुकसान होत असून पर्यावरणाचा समतोलही धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे सत्ताधारी पक्षाच्या लोकप्रतिनिधींनीदेखील दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही कारवाई होत नसल्याने अवैध रेती माफियांचे मनोबल वाढल्याचे बोलले जात आहे.दरम्यान, अवैध रेती वाहतुकीमुळे परिसरातील रस्त्यांची दुरवस्था होत असून नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा होत असल्याने अपघाताचा धोका वाढल्याचीही तक्रार स्थानिकांनी केली आहे.

जिल्हा प्रशासन आणि महसूल विभागाने तात्काळ लक्ष घालून बोडदा घाटावरील अवैध रेती उपसा व वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## दिशा फाउंडेशन संचलित माऊंट कॉन्व्हेंट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, मुलचा दहावीचा शंभर टक्के निकाल






दैनिक वादळ वार्ता
**मुल । प्रतिनिधी**

दिशा फाउंडेशन संचलित माऊंट कॉन्व्हेंट ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, मुल येथील इयत्ता दहावीचा निकाल यंदाही शंभर टक्के लागून विद्यालयाने यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशामुळे संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातील वेदांग तुफान अनंततुलवार याने ९४.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. तन्वी सुधाकर भुरसे हिने ९४.४० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर श्रेया दत्तू गोंगले हिने ९४.०० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक संपादन केला.याशिवाय विद्यालयातील इतर विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट यश संपादन करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विद्यार्थिनी पूर्वा विवेक मोहुर्ले हिने विज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवत विशेष प्राविण्य संपादन केले.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापिका, वर्गशिक्षक, विषय शिक्षक तसेच पालकांना दिले. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भाऊराव झाडे, मुख्याध्यापिका रीमा कांबळे, वर्गशिक्षक अशफाक सय्यद, कनिष्ठ महाविद्यालय प्रभारी दुष्यंत गणवीर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.विद्यालयाच्या या अभिमानास्पद यशामुळे पंचक्रोशीत सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## मराठवाडा–विदर्भावर पुढील २४ तास संकटाचे अवकाळी पावसासह वादळी वाऱ्यांचा इशारा

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या हवामानाचा विचित्र खेळ सुरू असून नागरिकांसह शेतकरीही मोठ्या चिंतेत सापडले आहेत. एका बाजूला कडक उन्हामुळे तापमानाचा पारा ४० अंशांच्या पुढे पोहोचला आहे, तर दुसऱ्या बाजूला अवकाळी पावसाने अनेक भागांना अक्षरशः झोडपून काढले आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील २४ तास मराठवाडा आणि विदर्भासाठी धोक्याचे असल्याचा इशारा दिला आहे. या भागांमध्ये वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.गेल्या काही दिवसांपासून राज्यात सतत हवामान बदलताना दिसत आहे. एप्रिल महिन्यापासूनच अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला, तर काही भागात उष्णतेने कहर केला. कोकणात दमट आणि उकाड्याचे वातावरण कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. दुसरीकडे विदर्भ आणि मराठवाड्यात पाऊस आणि वेगवान वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. या बदलत्या वातावरणामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून



शेतकऱ्यांच्या अडचणीतही मोठी भर पडली आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने उच्चांक गाठला आहे. जळगाव येथे राज्यातील सर्वाधिक ४२.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. अकोला आणि मालेगावमध्येही तापमान ४२ अंशांच्या घरात पोहोचले आहे. जळगावच्या चाळीसगाव तालुक्यात काही दिवस तापमानात घट झाली होती, मात्र पुन्हा उष्णतेची लाट वाढली आहे. वाढत्या उकाड्यामुळे दुपारच्या वेळेत रस्त्यांवर शुकशुकाट दिसत आहे. नागरिकांना घराबाहेर पडताना त्रास सहन करावा लागत असून उष्माघाताचा धोका वाढल्याची चिंता व्यक्त होत आहे.

## ह.भ.प.सिताराम शंकर वाणी यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**झरेकाठी । वार्ताहर**

संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथील ह.भ.प. सिताराम शंकर वाणी (वय ७०) यांचे १२ मे रोज रविवारला वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी सरस्वती सिताराम वाणी, दोन मुलं, एक मुलगी, बहीण, जावई, सुना वैशाली रमेश वाणी, वर्षा ज्ञानेश्वर वाणी तसेच नातवंड असा मोठा परिवार आहे.

बडोदा, गुजरात येथील कंपनीमध्ये प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून कार्यरत रमेश सिताराम वाणी तसेच रोहा, रायगड येथील ग्रेगोरियन पब्लिक स्कूलचे ग्रंथपाल प्राध्यापक ज्ञानेश्वर सिताराम वाणी आणि नंदा उर्फ वैशाली सुरेश मोरगे यांचे ते वडील होते. मंगल अण्णासाहेब शिंदे यांचे ते भाऊ होते, तर गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर गोरख अण्णासाहेब शिंदे व ड. शोभाताई मस्के यांचे ते मामा होते. तसेच कै. ह.भ.प. धोंडिबा मारुती बेंद्रे, बाभळेश्वर, राहाता, अहिल्यानगर यांचे ते जावई होते.पत्रकार सोमनाथ डोळे यांचे ते आतेभाऊ होत. त्यांच्या निधनामुळे नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

## घोडाझरी नहर फुटल्याने लाखो लिटर पाण्याची नासाडी;शेवटच्या टप्प्यातील शेतकरी हवालदिल

दैनिक वादळ वार्ता
**तळोधी बाळापूर । वार्ताहर**

शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या घोडाझरी सिंचन तलावाच्या नहरला भगदाड पडल्याने मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असल्याची घटना आज उघडकीस आली. तळोधी बाळापूर परिसरातील कात्यायन येथील बडबडा भागाजवळ ही घटना घडली असून, त्यामुळे शेवटच्या टप्प्यातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.उन्हाळी धान तसेच इतर पिकांच्या सिंचनासाठी यावर्षी घोडाझरी प्रकल्पातून नहरमार्गे पाणी सोडण्यात आले होते. हे पाणी शेवटच्या टोकावरील शेतांपर्यंत पोहोचत असतानाच नवानगरजवळील कालवा अचानक फुटला. परिणामी लाखो लिटर पाणी शेतात व परिसरात वाहून जात असून मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत आहे.कात्यायनच्या बडबडा परिसरातील शेतकरी हे नहरच्या शेवटच्या टप्प्यावर असल्याने त्यांना आधीच कमी दाबाने पाणी मिळत होते. त्यातच कालवा फुटल्यामुळे अनेक शेतांपर्यंत पाणी पोहोचण्याची शक्यता धूसर झाली आहे.

# पालिकेच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मुख्यालयात गौरव

## आयुक्त अश्विनी भिडे व शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमधील दहावी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आज महानगरपालिका मुख्यालयात विशेष गौरव करण्यात आला. शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर आणि बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या यशाचे कौतुक केले तसेच पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मार्च २०२६ मध्ये घेतलेल्या दहावी (एसएससी) परीक्षेत महानगरपालिकेच्या २४६ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या छोटेखानी गौरव समारंभाला शिक्षण समिती सदस्य, उपआयुक्त (शिक्षण) डॉ. प्राची जांभेकर, शिक्षणाधिकारी सुझाता खरे, कीर्तीवर्धन किरतकुडवे, मुख्याध्यापक, शिक्षक तसेच विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना अभ्यासाचे नियोजन, वेळेचे व्यवस्थापन, पुढील शिक्षणाची दिशा यांसारख्या विषयांवर चर्चा करण्यात आली. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी पुस्तके व गुणपत्रिका ठेवण्यासाठी विशेष फोल्डर भेट देण्यात आले.

महानगरपालिकेच्या २४६ माध्यमिक शाळांमधून यंदा एकूण १५ हजार ९०३ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १४ हजार ६४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, महानगरपालिकेच्या शाळांचा सरासरी निकाल ९२.०८ टक्के इतका लागला आहे. विशेष म्हणजे ७७ शाळांचा निकाल शंभर टक्के लागला असून, ६६ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत.स्वयं शेखर गोरेगावकर या विद्यार्थ्याने ९७.६० टक्के गुण मिळवत महानगरपालिकेच्या सर्व शाळांमधून प्रथम क्रमांक पटकावला. तो जी दक्षिण विभागातील सीताराम मिल कंपाऊंड माध्यमिक शाळेचा विद्यार्थी आहे.तर अशिया जाकीर सय्यद हिने ९६.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. ती के पश्चिम विभागातील डी. एन. नगर मुंबई पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी आहे.

तसेच दीपक अरुण तिवारी आणि जिनल हरेश सुमेसरा यांनी प्रत्येकी ९५.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. हे दोन्ही विद्यार्थी अनुक्रमे प्रभादेवी मुंबई पब्लिक स्कूल आणि गोखले रोड मुंबई पब्लिक स्कूलचे आहेत.महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# देवगावात संयुक्त जयंतीनिमित्त भीमगीतांचा जागर

## राजेंद्र इंगळे यांच्या प्रबोधनपर गीतांनी श्रोते मंत्रमुग्ध

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील देवगाव येथे महामानव तथागत गौतम बुद्ध, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दि. ९ मे रोजी भव्य समाज प्रबोधन भीमगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कवि गायक राजेंद्र इंगळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर केलेल्या भीमगीतांनी उपस्थितांची मने जिंकली.



कार्यक्रमाचे उद्घाटन देवगावचे सरपंच अतुल मुंडे, भाजपा युवा मोर्चाचे केज तालुका अध्यक्ष राहूल गदळे, पत्रकार गौतम बचुटे, पत्रकार अशोक नागरगोजे तसेच उपसरपंच सुभाष मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महामानवांच्या प्रतिमांचे पूजन करून प्रमुख पाहुण्यांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास गावातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गायक राजेंद्र इंगळे यांनी गौतम बुद्ध, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित प्रबोधनपर व सुमधुर गीते सादर केली. त्यांच्या प्रभावी गायनामुळे संपूर्ण परिसर भारावून गेला होता.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार महादेव गायकवाड, अर्जून गायकवाड, डॉ. शरद गायकवाड, चिवळा गायकवाड, अरुण कांबळे, विशाल गायकवाड, दैवान कांबळे, शिवाजी गायकवाड, राणु कांबळे, अजय कांबळे यांच्यासह संयुक्त जयंती उत्सव समितीच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शिवाजी कोण होता? पुस्तक वाचनातून बाळासाहेब आंबेडकर

## यांचा वाढदिवसा निमित्त स्वाभिमान दिवस उत्साहात साजरा



दैनिक वादळ वार्ता

**माजलगाव । प्रतिनिधी**

प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे दिनांक १० मे वार रविवार रोजी स्वाभिमान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे सामूहिक वाचन आणि वाटप करून अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सुंदरराव सोळंके महाविद्यालयासमोर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन व नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे बीड माझी जिल्हाउपाध्यक्ष सचिन उजगरे यांनी केले. यावेळी भारतीय बौध्द महासभाचे श्रीराम मोरे, दिगांबर कचरे पाटील, युवा उद्योजक पद्माकर कांबळे, अशोक कांबळे, धम्मानंद भाऊ साळवे अंकुश जाधव, श्रीपाद शिंदे, विनोद टाकणखार,अभिजीत साळवे, सिध्दार्थ पौळ यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे वाचन करून सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला. तसेच बाळासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय आणि संविधानवादी विचारांचा जागर करण्यात आला. कार्यक्रमात जयभीम आणि जय संविधानच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.या कार्यक्रमासाठी दत्ता कचरे, अजय शेरकर, विष्णू शेरकर, शरद काळे , सय्यद छोटू वैभव काळे ,आकाश काळे , अमोल गवळी , अमोल काळे , किरण फुलवरे , उमेश काळे , राजरत्न खळगे, महादेव काळे आदी प्रमुख उपस्थित होते.

# पत्रकार संघाकडून संजय भोकरे यांना "Z+' सुरक्षा देण्याची मागणी

## केज तहसीलदार व पोलीस स्टेशनला दिले निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज तालुक्याच्या वतीने राज्य संघटक तथा दैनिक 'जनप्रवास'चे समूह संपादक श्री.संजयजी भोकरे यांना तातडीने 'न+' दर्जाचे पोलीस संरक्षण देण्यात यावे,या मागणीचे निवेदन केज तहसील कार्यालयात तहसीलदार श्री.अशोक भंडारे साहेब यांना तसेच केज पोलीस स्टेशन येथे सादर करण्यात आले. पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी याबाबत शासनाने तातडीने कारवाई करावी,अशी मागणी केली आहे.



पत्रकार संघाने दिलेल्या माहितीनुसार,सांगली पोलिसांनी नुकताच श्री. संजयजी भोकरे यांच्या हत्येचा कट उधळून लावत तीन आरोपींना अटक केली आहे.या आरोपींकडून दोन देशी बनावटीची पिस्तुले,चार जिवंत काडतुसे तसेच धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. पोलिस तपासात आरोपी हे फेब्रुवारी महिन्यापासून भोकरे यांची रेकी करत असल्याचे समोर आले आहे.यापूर्वीही साधारण वर्षभरापूर्वी श्री.सिद्धार्थ संजय भोकरे यांना जीवे मारण्याच्या उद्देशाने कट रचण्यात आल्याची तसेच धमकीचे पत्र प्राप्त झाल्याची बाब समोर आली होती.त्यामुळे भोकरे कुटुंबीय गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर असल्याची भीती पत्रकार संघाने व्यक्त केली आहे. सध्याच्या घडामोडींनंतर श्री.संजयजी भोकरे यांनी स्वतः पुन्हा हल्ला होण्याची शक्यता व्यक्त केल्याचे पत्रकार संघाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अंबाबाई तालीमसंस्थेच्या जमिनी हडपण्याच्या उद्देशाने हा सर्व प्रकार सुरू असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

यावेळी पत्रकार संघाने शासनाकडे काही महत्त्वाच्या मागण्या केल्या असून त्यामध्ये श्री.संजयजी भोकरे यांना तातडीने 'न+' दर्जाचे पोलीस संरक्षण देणे, सिद्धार्थ भोकरे यांना पूर्वी मिळालेल्या धमकीची आणिआताच्या कटाची सखोल चौकशी करणे,तसेच या कटा मागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करणे या मागण्यांचा समावेश आहे.राज्यातील पत्रकारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी आणि त्वरित कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज तालुक्याच्या वतीने करण्यात आली आहे.

## अक्कलकुवा तालुक्यात खळबळ

# बेपत्ता दांपत्याचा जंगलात गळफास घेतलेला मृतदेह आढळला

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी मोलगी**

अक्कलकुवा तालुक्यातील बर्डी परिसरातील एका तरुण दांपत्याने अज्ञात कारणावरून वनविभागाच्या क्षेत्रात पळसाच्या झाडाला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून हे दांपत्य बेपत्ता होते, अखेर रविवारी सकाळी त्यांचे मृतदेह आढळून आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.



बर्डी येथील चापरीपाडा भागात राहणारे कालुसिंग चंदा तडवी (वय २२) आणि त्यांची पत्नी हिना कालुसिंग तडवी (वय २०) हे दोघे मजुरी करून आपला उदरनिर्वाह करत होते. ३ मे २०२६ पासून ते १० मे २०२६ च्या दरम्यान कोणत्यातरी अज्ञात कारणावरून त्यांनी वर्डी गावाजवळील 'भगतपाडा' वनक्षेत्रात नायलॉनच्या दोरीने पळसाच्या झाडाला गळफास घेतला.

१० मे रोजी सकाळी ९,३० वाजेच्या सुमारास स्थानिक नागरिकांना झाडाला लटकलेल्या अवस्थेत दोन मृतदेह दिसून आले. घटनेची माहिती मिळताच मृताचे भाऊ रोतन्या चंदा तडवी यांनी मोलगी पोलीस ठाण्यात धाव घेऊन माहिती दिली. हे दांपत्य गेल्या काही दिवसांपासून बेपत्ता असावे, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता मोलगी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी मोलगी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता १९४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट होऊ शकलेले नाही.

सदर घटनेचा पुढील तपास प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार किरण धनगर आणि पोलीस उपनिरीक्षक सागर गाडीलोहार हे करत आहेत.

# सायकलचे पंचर काढुन दोन्ही मुलींना बनविले पोलिस कॉन्स्टेबल

## पेनुर येथील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या मुलीची यशोगाथा

दैनिक वादळ वार्ता

**लोहा । राजकुमार पिल्लोळे!**

प्रयत्न करता वाळु रगडाही निघे तेल या म्हणीप्रमाणे लोहा तालुक्यातील मौजे पेनुर येथील केवळ १ एकर शेती असणाऱ्या व सायकलचे पंचर काढुन आपली उपजीविका भागविणाऱ्या विठोबा गवते यांच्या दोन्ही मुली नागपूर पोलीस दलात पोलीस म्हणून निवड झाली आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटल्याप्रमाणे शिक्षण हे वाघीनीचे दुध आहे जो हे प्राषण करील तो गुरगुरल्या राहणार नाही व शिक्षण हे आपल्या गरिबीवर मात करण्याचे साधन आहे.

लोहा तालुक्यातील मौजे पेनुर येथील केवळ १ एकर शेती असलेले अल्पभूधारक शेतकरी विठोबा गवते यांना दोन मुली व एक मुलगा आहे. घरची परिस्थिती बेताची असताना ही त्यांने आपल्या दोन मुली व एका मुलांना चांगले शिकविले. काबाडकष्ट करून आपल्या पाल्यांना शिक्षणासाठी त्याने नेहमी पाठीबा दिला.

वडील हे काबाडकष्ट करून आपल्याला शिक्षण शिकवीत आहेत. त्यांच्या मेहनतीचे चीज झाले पाहिजे हा उध्दांत हेतु म्हणी ठेवून त्यांच्या दोन्ही मुलींने जिद्द, परिश्रम जोरावर व अभ्यासात सातत्य ठेवून त्यांची मोठी मुलगी कु. ज्योती विठोबा गवते हिने पोलिस भरतीची तयारी करुन २०२२ मध्ये नागपूर पोलीस दलात भरती झाली व मोठ्या बहिणीच्या पावलावर पाऊल ठेवत छोटी बहीण कु.स्वाती विठोबा गवते हीची सुध्दा २०२६ मध्ये नागपूर पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली.



पेनुर गावकऱ्यांच्या वतीने सत्कार

बेटी पढाव बेटी बचाव या घोषवाक्ये प्रमाणे पेनुर येथील अल्पभूधारक शेतकरी विठोबा गवते यांनी मुलगा मुलगी आसा भेदभाव न करता आपल्या दोन्ही मुलींना चांगले शिक्षण शिकवून त्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहुन दोन्ही मुलींना पोलीस दलात भरती होण्यास सिंहांचा वाटा उचलल्यामुळे पेनुर येथील सामाजिक कार्यकर्ते मारोती एजगे व पत्रकार विरभद्र एजगे, गिरीष एजगे या बंधू च्या पुढाकारातून गावचे माजी सरपंच बाबाराव पाटील गवते,माजी सरपंच गंगाधर पाटील गवते, युवानेते बाळू पाटील गवते, राम पाटील गवते, चंद्रकांत पाटील गवते, विजय सूर्यवंशी व सर्व गावकऱ्यांनी महिला पोलिस कॉन्स्टेबल कु.ज्योती विठोबा गवते व पोलीस कॉन्सटेबल कु. स्वाती विठोबा गवते यांचा सत्कार केला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077